## कोर्ट विद्यमान श्रीमती प्रियदर्शनी बोरकर, तहसिलदार हिंगणा यांचे महसूल न्यायालय हिंगणा

रा.मा.क्र. 08/एन.ए.पी.-34/2021-22
मौजा-हिंगणा, प.ह.नं. 49,
तालुका-हिंगणा, जि. नागपूर

# परिशिष्ट "ब"

## महाराष्ट्र जमिन महसूल संहीता 1966 चे कलम 42 अ मधील तरतूदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अश्या जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाची

## सनद

(पारीत दिनांक - 28 जुलै 2022)

ज्याअर्थी अर्जदार श्री. नरेंद्र उत्तमराव लारोकर व इतर 5 , रा. नागपूर यांनी मौजा- हिंगणा, सा. क्र. 49 येथील सर्व्हे क्र 413/2 आराजी 0.96 हे. आर पैकी 0.68 जागेवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे सुधारीत कलम 47(ब) अन्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक आकारणी करण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केला. त्या अनुषंगाने या कार्यालयातील प्रकरण क्रमांक रामाक्र 08/ एन.ए.पी. 34/(42-ब)/2021-22 दिनांक 28.10.2021 अन्वये क्षेत्र 0.68 हे.आर. (6800 चौ.मी.) जागेवर अकृषक आकरणी करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी अर्जदार श्री. नरेंद्र उत्तमराव लारोकर व इतर 5 , रा. नागपूर यांनी मौजा- हिंगणा, सा. क्र. 49 येथील सर्व्हे क्र 413/2 आराजी 0.96 हे. आर पैकी 0.68 (6800.00 चौ.मी) आकारणी 4.50 भोग. वर्ग-1 जमीनीवरील निवासी प्रयोजनार्थ या जमीनीवरील निवासी प्रयोजनार्थ अभिन्यास नकाशा/बांधकाम नकाशा मंजुर करणेबाबत मुख्याधिकारी, नगर पंचायत हिंगणा यांचेकडे महाराष्ट्र नगर पालीका/नगर पंचायत आणि औद्योगिक वसाहत अधिनियम 1965 तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 44 व 45 अन्वये अर्ज व विकास आराखडा/रेखांकन आखणी नकाशा सादर केलेला आहे.

ज्याअर्थी मुख्याधिकारी, नगर पंचायत हिंगणा (नियोजन प्राधिकरण) यांनी सदरचा नकाशा महाराष्ट्र प्रादेशिक योजनेच्या नियमावलीच्या तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे उक्त जागेवरील प्रस्तावित निवासी प्रयोजनार्थ अभिन्यास नकाशा/बांधकाम नकाशास अटी व शर्तीचे अनुषंगाने पत्र क्र.प.हि./जा.क्र.1214/2022 दिनांक 15/07/2022 अन्वये विकास परवानगी दिलेली आहे.

ज्याअर्थी सदरहु रेखांकन/अभिन्यास मंजुर रेखांकन/अभिन्यास नकाशा प्रत महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे सुधारीत कलम 42 अ अन्वये "परिशिष्ट ब" मध्ये सनद निर्गमित करणेकरीता या कार्यालयात प्राप्त झालेली आहे.

ज्याअर्थी मुख्याधिकारी, नगर पंचायत हिंगणा यांनी नियमानुकुल/नियमितीकरण करुन मंजूर केलेला अभिन्यास नकाशा या सनदेबाबत सोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| | AREA STATEMENT | | |
|---|---|---|---|
| 1 | TOTAL AREA AS PER 7/12 RECORD | 9600.00 | SQ.MT |
| 2 | TOTAL AREA AS PER MEASUREMENT SHEET | 6800.00 | SQ.MT |
| 3 | TOTAL AREA UNDER LAYOUT | 6800.00 | SQ.MT |
| 3 | AREA UNDER RECREATION OPEN SPACE | 683.78 | SQ.MT |
| 4 | TOTAL AREA UNDER INTERNAL ROAD | 831.07 | SQ.MT |
| 5 | AREA UNDER ROAD WIDENING | 442.95 | SQ.MT |
| 6 | TOTAL AREA UNDER AMENITY SPACE | 0.00 | SQ.MT |
| 7 | TOTAL AREA UNDER PLOT | 4792.20 | SQ.MT |

आणि ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटदाराने शासनाने, उक्त संहीतेच्या कलम 47 अ नुसार देय रुपांतर कराची व नमुद निवासी अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम निर्धारित करण्यात आलेली असून संबंधित तलाठी यांना अकृषक आकरणी आदेशान्वये अकृषक आकारणी शासनजमा करणेबबात निर्देशित केलेले आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहीतेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखीत अनधिकृत अभिन्यास नियमितीकरण/नियमानुकुल परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेला निवासी अकृषिक वापरापोटी उक्त सहिंतेच्या कलम 42-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

1) आकारणी : उक्त जमिनीच्या भोगवटदारास उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक 31 जुलै, 2022 रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये 0.10 प्रती चौ. मी. प्रमाणे रूपये 680/- या दराने परीगणित होणारी वार्षिक आकारणी देईल अशी उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये तहसिलदार कडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल. अशी सुधारीत आकारणी देईल.
2) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.
3) वरीलप्रमाणे नियमानुकुल/नियमितीकरण करुन मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकारणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमीत झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराचे क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरण कडून मंजूर झाल्यापासून 30 दिवसाच्या आत तहसिलदार यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहिल.
4) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास तहसिलदार यास, उक्त संहितेच्या अन्वये तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीअन्वये जी भरण्यास उपयोग करता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोट कलम (2) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमिन भोगवटादार यांच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.
5) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने उपअधिक्षक, भुमी अभिलेख, हिंगणा यांचे कडून मोजणी करून घेणे बंधनकारक राहिल त्यानंतरच सदर सनद प्रभावी होईल.त्यांची साक्ष म्हणुन तहसिलदार, हिंगणा या तहसिलदार अधिकाऱ्याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आणि आपल्या पदाची मोहर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक 28/07 /2022 रोजी आपली सही केली आहे.

(भोगवटदाराची स्वाक्षरी)
(श्री. नरेंद्र उत्तमराव लारोकर) N·U·[signature]

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) श्री. कुणाल पिसाळ [signature]

ब) श्री. अरविंदे पिसाळ [signature]

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) श्री. कुणाल पिसाळ [signature]

ब) श्री. अरविंदे पिसाळ [signature]

आम्ही असे जाहिर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: श्री. नरेंद्र उत्तमराव लारोकर यांनी स्वाक्षरी केली, ती व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती अ[illegible] आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्यांनी या ठिकाणी आमच्या समक्ष आपली स्वाक्षरी केलेली आहे.

(प्रियदर्शनी बोरकर)
तहसिलदार, हिंगणा

प्रतिलीपी : -

1) तलाठी सा . क्र . 49 मौजा — हिंगणा यांना उचित कार्यवाहीस तथा या कार्यालयाकडून 42-ब चे आदेश पारित झाल्यापासून अर्जदारांकडून अकृषक सारा वसूल करुन शासन जमा करावा व त्याबाबतचा अहवाल चालानचे प्रतीसह या कार्यालयास सादर करावा.

2) अर्जदार श्री. नरेंद्र उत्तमराव लारोकर, रा. हिंगणा ता. हिंगणा जि. नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

तहसिलदार हिंगणा